Impact Factor : 3.452

ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

September - 2017

Special Issue - XIX



# 'Dr. B. R. Ambedkar and Different Dimensions to Social Change'

**Guest Editor : Dr. R. M. Kulkarni**

- Principal, RNC Arts, JDB Commerce & NSC Science College, Nashik Road, (M.S.) India
- Zonal Secretary (Nashik Zone), Gokhale Education Society, Nashik

**Chief Editor : Prof. Dhanraj Dhangar**

- Asst. Prof. (Deptt. of Marathi) M.G.V.'S Arts & Commerce College, Yeola, Dist. : Nashik, (M.S.) India

**Executive Editor : Dr. Mahesh D. Auti**

**Associate Editors : Dr. Indira V. Athawale & Dr. Sunil D. Joshi**

**This Journal is indexed in -**

- UGC Approved Journal No. - 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

For Details Visit to : www.researchjourney.net

Swatidhan Publications

| Sr. No. | Title of the Paper | Name | Page No. |
|---|---|---|---|
| 76 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक योगदान | शशिकांत सुर्यभान खेमनर | 403 |
| 77 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन | स्वराली चंद्रकांत कुलकर्णी | 407 |
| 78 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरप्रणित 'धम्मराज्य' या संकल्पनेचा विचार आणि साहित्यकृतींचा अभ्यास | अश्विनी आत्माराम तोरणे | 410 |
| 79 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मराठी वृत्तपत्र लेखनाची भाषा व शैली | मंजुषा कुलकर्णी, उत्तम करमाळकर | 415 |
| 80 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक धोरण | उज्वला ग. म्हस्के, लता दोधू पवार | 422 |
| 81 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूलगामी विचारांनी समृध्द अध्यक्षीय भाषणे | विजया धनेश्वर | 425 |
| 82 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक न्याय | विनोद निरभवणे | 429 |
| 83 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतरविषयक भूमिका | संभाजी आण्णू शिंदे | 434 |
| 84 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थी जीवनविषयक विचार | संतोष दत्तात्रय बोडके | 439 |
| 85 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मागासवर्गीयांचे शिक्षण | शंकर आवारे | 448 |
| 86 | डॉ. आंबेडकर यांचा स्त्रीमुक्तीविषयक विचार व कार्य | सुजाता विश्वासराव आठवले | 453 |
| 87 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातील शेतकरी लढा | सुनिल रामकृष्ण वाघमारे | 455 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) – 0.676 (2013)
Special Issue 19 : 'Dr. B. R. Ambedkar and Different Dimensions to Social Change'
ISSN : 2348-7143
September 2017

# डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन

**स्वराली चंद्रकांत कुलकर्णी**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ , पुणे

डॉ. आंबेडकर कोलंबिया विद्यापीठात एम ए करत होते. त्याकाळी एम.ए. च्या पदवीसाठी शोधनिबंध सादर करावा लागत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी administration and finance of the east india company या विषयावर ४२ पृष्ठांचा एक प्रबंध.

या शोधनिबंधात इ.स. १७७२ ते १८५८ पर्यंतच्या काळातील ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय धोरणांचा आणि वित्तविषयक धोरणांचा अभ्यास केला आहे कंपनीचे हे धोरण भारतीयांची दिवाळखोरी काढणारे आणि भारतीयांसाठी कसे त्रासदायक आहे याचा आढाव त्यांनी आपल्या या ग्रंथात घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ईस्ट इंडिया भारतात प्रशासन करते तर दुसरीकडे व्यापारही करते. या व्यापारातून होणाऱ्या मोठ्या नफ्याचा हि उपयोग स्वतःसाठी करते. या नफ्यातील प्रचंड गोंधळाची कल्पना ब्रिटिश प्रशासनाला आल्याने त्यांनी कायदा करून ईस्ट इंडिया कंपनीने प्रशासन आणि व्यापार यांचा हिशोब वेगळा ठेवावा असे बजावले. इ.स.१८१३ मध्ये भारतातील व्यापारावर असणारी इस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी काढून इंग्लंड मधील जनतेसाठी सर्व व्यापार खुला करण्यात आला. याचाच अर्थ आतापर्यंत फक्त ईस्ट इंडिया कंपनी व्यापार करून नफा कमवीत होती. आता तर सर्व इंग्लंडच भारताबरोबर व्यापार करून दिवाळखोरी काढणारे होते. व ब्रिटिशांनी पुढे तसेच केले कारण इ. स १८५६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त झाली. आणि भारताचा राज्यकारभार इंग्लंडच्या संसदेतून चालविला जाऊ लागला. ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांना कसे लुबाडले, देशाची आर्थिक दैना कशी झाली याचे स्पष्ट विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उदाहरणासह स्पष्ट केले आहे. कंपनीला मिळणार प्रचंड नफा भारतात न राहता तो इंग्लंडला गेला. मग तो खंडीच्या स्वरूपात, भागधारकांच्या लाभांश स्वरूपात इंग्लंडला गेला. याशिवाय महसूलाच्या माध्यमातून मिळालेला पैसे कंपनीच घेत असे. कंपनी सरकार दोन माध्यमातून कर्जे उभारत असे. १. भारतीय कर्ज २. देशी कर्ज रोखे या माध्यमातून कर्जे उभारून भारतीय कर्ज ६०७ लक्ष पौंडपर्यंत व देशी कर्जरोखे ६६ लक्ष पौंडपर्यंत वाढविली होती. भारतातील कर्ज भारतात हुंड्या देऊन उभारले जात होते. तर देशी कर्जरोखे इंग्लंड कर्जरोखे विकून उभारले जात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते हि कर्जे कंपनीच्या वेगवेगळ्या लढाईमुळे झाली होती. यात देशी आणि विदेशी कर्जरोख्यांमध्ये तफावत होती. तरी याचा फायदा ब्रिटिश पार्लमेंटलाच होत होता. कारण ब्रिटिश पार्लमेंट कंपनी सरकारकडून फायदा घेण्याबरोबर भारतीयांची लुबाडणूक करून दुतर्फी फायदा उठवत होते. यासाठी डॉ. आंबेडकरांनी इ. स. १७९२ ते १८८६ मधील महसूलाची आकडेवारीही दिली आहे. ब्रिटिश अफू –४.७, सीमा शुल्क –६.२, मीठ –११ आणि शेतसारा ५४ प्रतिशत असा महसूल वसूल करीत होते. उरलेला महसूलही वेगवेगळ्या करांच्या रूपात भारतीयाच्याकडून घेत होते. त्यामुळे अगोदरच दारिद्र्यात पडलेला भारतीय माणूस अधिकच खोलात जात असे.

एवढे असूनही या महसूलातून ब्रिटिश भारतीय जनतेसाठी कोणतीही योजना राबवित नव्हते. उलट या मिळालेल्या मोठ्या पैशाची ब्रिटिश सरकार कसे विल्हेवाट लावीत होते याचा आढावा घेताना डॉ. आंबेडकर म्हणतात, या पैशाचा विनियोग खरे तर भारतीयांसाठी लोकोपयोगी कामे व्हावीत यासाठी होणे गरजेचे होते. पण तसे झाले नाही. यातील फारच थोडी रक्कम

जनतेच्या हितासाठी वापरली जात असे. यासाठी बाबासाहेब उदाहरण देऊन हे स्पष्ट करतात इ. स. १८१९ ते १८२० साली १३ टक्के रक्कम कर्जावरील व्याज तर लष्करावरील खर्च ६४.३ टक्के एवढे करण्यात आले. याचाच अर्थ हा खर्च इंग्लंडच्या आर्थिक विकासासाठी होता. एवढेच नवे तर लष्करावरील खर्च जरी वाढविला तरी भारतीय शिपायांना वेतन अत्यंत कमी होते. चार भारतीय शिपायांचे वेतन आणि. एक यूरोपीय शिपायाचे वेतन सारखे होते. त्यामुळे भारतीयांना याचा कोणताच फायदा मिळत नव्हता हे बाबासाहेबानी जनतेसमोर मांडले आणि इंग्रज करीत असलेले हे भारतीयांचे शोषण भारतीयांसाठी किती दुर्दैवी आहे याचेही ते स्पष्टीकरण करतात

इ.स. १८५८ ला कंपीनीचे सरकार ब्रिटिशांनी बरखास्त केले. त्यावेळी कंपनीवर जो कर्जाचा बोजा होता तो कुणी फेडायचा हा प्रश्न समोर आला. त्यावेळी ब्रिटिश पार्लमेंटने जो युक्तिवाद केलर आहे त्याचा हा उल्लेख बाबासाहेबानी केला आहे यावेळी भारतीय जनता अत्यंत दैन्यावस्थेत होती, दारिद्र्यात खितपत पडली होती. अशावेळी ब्रिटिश पार्लमेंटनी कंपनी सरकारचे ६९३ लाख पौंडाचे कर्ज भारतीय जनतेवर टाकून त्यांच्या दारिद्र्यात आणखी कशी भर टाकली आहे. याचे स्पष्टीकरण अत्यंत प्रभावीपणे डॉ. आंबेडकरांनी या ग्रंथात केले आहे.

इ. स. १८५८ च्या कायद्यातील तरतूदीबाबत भारतीय महसुलाचे उत्पन्न ब्रिटिश पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहाच्या संमतीशिवाय भारताबाहेरील कारवाईचा खर्च भागविण्यासाठी वापरला जाणार नाही कालमाबाबत विधायक तरतूद असे विधान डॉ आर. सी. दत्त यांनी केले परंतु या विधानास बाबासाहेबानी आदरपूर्वक विरोध केला. कारण त्यांच्या मते या कायद्याने भारतीय महसुलाचा विनियोग भारताबाहेर करण्यात येत होता. याठिकाणी पूर्व संमती असा उल्लेख असायला पाहिजे होता.

शोधनिबंधच्या शेवटी आंबेडकर म्हणतात, भारताने इंग्लंडला खूप दिले परंतु भारताला मात्र काहीच मिळाले नाही. आर्थिक बाबतीत हे निर्विवाद सत्य आहे. पण भारतीयांनी इंग्रजांचे ऋणी असायला पाहिजे कारण कायदा व सुव्यवस्था, पाश्चात्य शिक्षणाची ओळख, विद्यापीठे, न्यायालये, प्रशासन उभारणी याबाबी ब्रिटिशांमुळे सुरु झाल्या. असं असले तरी आर्थिक अध:पतनाची बदल्यात पाशवी स्वीकाहार्य आहे का? याचे उत्तर ते जनतेलाच विचारतात.

The problems of the rupee; it's origin and solution, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून लिहलेला अत्यंत महत्वाचा ग्रंथ म्हणजे रुपयाचा प्रश्न, त्याचा उगम आणि उपाय हा होय. यामध्ये सात प्रकरणे असून सन१९४७ साली या ग्रंथाचे नाव बदलून; ''भारतातील चलन व बँकांचा इतिहास ''असे करण्यात आले. याचवेळी बाबासाहेब बॅरिस्टरचाही अभ्यास करीत होते. एकाचवेळी दोन वेळा पदव्या घेणारे ते बहुदा पहिलेच भारतीय असावेत.

या प्रबंधामध्ये सोने व चांदी यावर आधारलेल्या प्रमाणापासून रुपयाचे चलन चांदीच्या प्रमाणाकडे कसे आले ते सांगितले आहे दुसऱ्या प्रकरणात चांदीच्या प्रमाणामुळे रुपयाशी असलेली समानता कशी विस्कळीत झाली याचे विवेचन तर तिसऱ्या प्रकरणात चांदीच्या प्रमाणामुळे अस्थिर रुपयांच्या अंगी निर्माण होणारे दोष याची माहिती आहे. चौथ्या प्रकरणात रुपयाचे चलन सोन्याच्ता प्रमाणाकडे कसे झुकले याचे विवेचन तरपाचव्या प्रकरणात सोन्याच्या प्रमाणापासून प्रमाणाची अदलाबदल कशी होत गेली. याचे स्पष्टीकरण आहे. सहाव्या प्रकरणात चलनाच्या अदलाबदलाच्या स्थैर्यावर कास परिणाम झाला याचा विचार आणि सातव्या प्रकरणात पुन्हा सोन्याच्या प्रमाणाकडे जाण्याची मीमांसा आहे.

भारतीय रुपयाच्या चलनाचे परिणाम आणि जडणघडण कशी होत गेली याची चिकित्सा डॉ. आंबेडकरांनी केलेली आहे. रुपयाची क्रयशक्ती कमी झाल्याने रुपयाची किंमत कमी झाली हे चुकीचे आहे. हे त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले.

सुरवातीला देशात सुवर्ण परिणाम व रुपयाचे परिणाम व रुपयाचे परिणाम अशी दुहेरी पद्धत सुरवातीला देशात आस्तित्वात होती. इ स. १८५३ च्या कायद्यान्वये सुवर्ण परिणाम रद्द करुनदेशभर रुपयाच्या परिमाणाच्या स्वरूपाला चालनपद्धतीचे एकसूत्रीकरण करण्यात आले. त्यानुसार १८० ग्राम वजनाच्या चांदीचा रुपया प्रचलित झाला. पण पुढे चलन अपुरे पडू लागल्याने ती गरज भागविण्यासाठी लष्कर, सरकारी अधिकाऱ्याला वेतन, मानधन हे धान्य किंवा जमीन या रूपात दिले जाऊ

लागले. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढल्याने चलनही वाढले. अर्थ तज्ज्ञांनी सुवर्ण विनिमयाचा पुरस्कार केला होता तर आंबेडकरांचा त्यास विरोध होता. डॉ. आंबेडकरांच्या मते, सुवर्ण विनिमयात लवचिकता असली तरी ते दुधारी शस्त्र आहे. चालननिर्मिती लवचिक असल्यामुळे त्यावर अतिनिर्बंध येऊ शकतात. त्यावरून चलन फुगवटा, भाववाढ होऊन रुपयांचीकिंमत घसरते. त्यामुळे रुपयाचे स्थान डळमळीत होऊ शकते. असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे. एकंदरीत वरील सर्व गोष्टीवरून असे लक्षात येते कि महान अर्थ तज्ज्ञ असलेल्या आंबेडकरनी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ने भारतीयांचे आर्थिक शोषण कसे केले हे जनतेसमोर मांडले आणि रुपयाची घडण कशी बदलत गेली, त्याचे काय बदल केले पाहिजेत याचे विवरणच आपणास स्पष्ट जाणवते.

## संदर्भ सूची :

१. सर्वदर्शी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संपा.प. विठ्ठल. /नागोराव कुंभार, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१६
२. आंबेडकर बाबासाहेब, भाषणे आणि लेखन, खंड १, २
३. आंबेडकर बाबासाहेब,डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पिचेस खंड १, एज्युकेशन डिपार्टमेंट गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई, १९७९
४. आंबेडकर्स काँट्रीब्युशन टू इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल विकली,१९९०
५. डॉ.आंबेडकर विचारमंथन,कुबेर वा ना,केसरी प्रकाशन,पुणे १९७२
६. संविधानसभा डिबेट्स,अनुवाद,प्रा देविदास घोडेस्वार,प्रका,राईट थिंकर्स पब्लिकेशन्स अँड डोकमेंटशन,प्रा. लि. मुंबई २०१३.
७. महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीतील इतिहास,डॉ कटारे-वाघमारे-पाटील,चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद २००९
८. समग्र आंबेडकर चरित्र खंड १ ते २४,कांबळे बी.सी,सुगावा प्रकाशन पुणे,२००४
९. डॉ बाबासाहेब आंबेडकर,डॉ किर धनंजय,पॉप्युलर प्रकाशन मुंबई,१९९२
१०. डॉ भीमराव रामजी आंबेडकर,खंड १ ते १२ खैरमोडे,चा.भ.सुगावा प्रकाशन,पुणे १९९२
११. डॉ बाबासाहेब आंबेडकर, भाषणे आणि विचार, खंड १ ते ४, दहात, धनराज, संकेत प्रकाशन, नागपूर, २००७